# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

**(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)**

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक ०७/०७/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** **आपत्ती प्राधान्य**

**वाचाः-** १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक १४/०३/२०२०.
४) महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम २०२०.

विषयः- करोना संदर्भात प्रवासाच्या कारणांसाठी कोविड-१९ लक्षणे नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र देण्याबाबत...

## परिपत्रक

ज्याअर्थी, जालना जिल्ह्यात करोना विषणूचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रणात आणणे व करोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव आणखी वाढुनये यासाठी योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, राज्य शासनाने एका जिल्ह्यातून दुस-या जिल्ह्यात किंवा राज्यात जाण्यासाठी ई-पास प्रणाली सूरू करण्यात आलेली आहे व सदर प्रणालीवर वैद्यकीय अधिका-यांचे कोविड-१९ लक्षणे नसल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र (Not having Covid-19 Symptom) अपलोड करावे लागते व यासाठी जिल्ह्यातील नागरीक मोठ्या प्रमाणात सदरील वैद्यकीय प्रमाणपत्र हे वैद्यकीय अधिकारी यांचेकडून घेण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे गर्दी करीत आहे व सदरील गर्दीमुळे शासनाच्या सामाजिक अंतर पाळण्याचे नियम व्यवस्थीत पाळणे न जाण्याची शक्यता आहे व यामुळे करोना विषाणूचा प्रादुर्भाव आणखी वाढण्याची शक्यता आहे.

त्याअर्थी, मी रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना मला महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम २०२०, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारान्वये असे आदेशीत करीत आहे की, जालना जिल्हयातील कोणत्याही नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीक/अधिकारी (डॉक्टर) ने दिलेले कोविड-१९ लक्षणे नसल्याबाबत (Not having Covid-19 Symptom) वैद्यकीय प्रमाणपत्र हे ई-पास प्रणाली द्वारे प्रवास करण्यासाठी वैध राहील व नागरीकांनी सदरील वैद्यकीय प्रमाणपत्र घेण्यासाठी सामान्य रुग्णालय, जालना येथे गर्दी करू नये.

Raut

**(रविंद्र बिनवडे)** भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी व अधयक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**
7/7/2020

जिल्हाधिकारी कार्यालय जालना

**प्रत-(आवश्यक कार्यवाहीस्तव)**
१. पोलीस अधिक्षक, जालना.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. जालना.
३. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, जालना.
४. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जालना.
५. इंडीयन मेडीकल असोसिएशन सलंग्न सर्व वैद्यकीय अधिकारी जि.जालना (मार्फत जिल्हा शल्य चिकित्सक,सा.रु., जालना)
६. जिल्हा माहिती अधिकारी, जालना यांना प्रसिध्दीस्तव.

**प्रतिलीपी (माहितीस्तव)**
१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.